11 APR 2024

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# महात्मा फुले प्रखर बुद्धिवादी साहित्यिक

## डॉ. रवींद्र ठाकूर : विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : महात्मा जोतिराव फुले हे प्रखर बुद्धिवादी लेखक, साहित्यिक होते; मात्र, त्यांचा कोणीही साहित्यिक म्हणून उल्लेख केला नाही, हे वेदनादायी आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. रवींद्र ठाकूर यांनी गुरुवारी केले.



रवींद्र ठाकूर

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले, शाहू, आंबेडकर सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत गुरुवारी सकाळी महात्मा फुले जयंतीच्या निमित्ताने विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' (@ShivVarta) या युट्यूब वाहिनीवरून डॉ. ठाकूर यांचे 'महात्मा फुले: व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावर विशेष व्याख्यान झाले.

डॉ. ठाकूर म्हणाले, महात्मा फुले यांनी आपल्या आयुष्यात विपुल लेखन केले. अखंड काव्यरचना, 'तृतीय रत्न'सारखे नाटक, शेतकऱ्याचा आसूड, ब्राह्मणाचे कसब, गुलामगिरी यांसारखे ग्रंथ, पोवाडे अशी महत्त्वपूर्ण साहित्यनिर्मिती केली. मात्र त्यांना या समाजाने साहित्यिक म्हणून मान्यता दिली नाही. ते प्रखर बुद्धीवादी होते. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले.

12 APR 2024
जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा फुले प्रखर बुद्धिवादी साहित्यिक : डॉ. ठाकूर

**कोल्हापूर :** महात्मा जोतिराव फुले हे प्रखर बुद्धिवादी लेखक, साहित्यिक होते. मात्र, त्यांचा कोणीही साहित्यिक म्हणून उल्लेख केला नाही, हे वेदनादायी आहे, असे प्रतिपादन डॉ. रवींद्र ठाकूर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे फुले, शाहू, आंबेडकर सप्ताह अंतर्गत गुरुवारी महात्मा फुले जयंतीच्या निमित्ताने विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यू ट्यूब वाहिनीवरून 'महात्मा फुले : व्यक्ती आणि वाङ्मय' या विषयावर ते बोलत होते.

डॉ. ठाकूर म्हणाले, महात्मा फुले यांनी विपुल लेखन केले. अखंड काव्यरचना, 'तृतीय रत्न'सारखे नाटक, शेतकऱ्याचा असूड, ब्राह्मणाचे कसब, गुलामगिरी यासारखे ग्रंथ, पोवाडे अशी महत्त्वपूर्ण साहित्यनिर्मिती केली. सत्सारसारखे नियतकालिक काढून पत्रकारिताही केली. मात्र, त्यांना या समाजाने साहित्यिक म्हणून मान्यता दिली नाही. ते प्रखर बुद्धिवादी होते. महात्मा फुले यांच्या विचार व कार्याकडे अभ्यासकांचे, साहित्यिकांचे लक्ष जाऊ लागले आहे. त्यांच्या साहित्याविषयी संशोधन, लेखन होऊ लागले आहे, ही महत्त्वाची बाब आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले.